# साजिद मीर 'जिवंत' कसा?

## 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने पाकिस्तानचा दुटप्पीपणा उघड





**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

पाकिस्तानने मृत घोषित केलेला २६/११चा मास्टरमाइंड साजिद मीर अचानक जिवंत सापडला आणि त्याला २०२२ मध्ये अटक करण्यात आली. 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने साजिदचा उल्लेख केल्यामुळे पाकिस्तानचा दुटप्पीपणा आणि जागतिक दबाव चुकवण्याच्या प्रयत्नांचा पर्दाफाश झाला.

भारताने बुधवारी पहाटे पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादाशी संबंधित ठिकाणांवर हवाई कारवाई केली. त्यानंतर २६/११च्या दहशतवादी हल्ल्यातील मुख्य सूत्रधार साजिद मीरचे पुन्हा एकदा नाव चर्चेत आले. या कारवाईनंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना आश्रय देण्याच्या दुटप्पी धोरणावर प्रकाश टाकला. मिस्री यांच्या त्यांच्या वक्तव्यात साजिद मीरच्या प्रकरणाचा विशेष उल्लेख होता; ज्याला पाकिस्तानने एके काळी मृत घोषित केले होते; मात्र आंतरराष्ट्रीय दबावाखाली तो पुन्हा जिवंत आढळला आणि त्याला अटक करण्यात आली.

### काय म्हणाले मिस्री?

- पाकिस्तानच्या भारतविरोधातील सीमापार दहशतवादाला एक दीर्घ इतिहास आहे. साजिद मीर हे पाकिस्तानच्या दहशतवादावरील फसव्या भूमिकेचे ठळक उदाहरण आहे. एका मृत घोषित केलेल्या दहशतवाद्याला आंतरराष्ट्रीय दबावाखाली पुन्हा जिवंत दाखवले गेले आणि अटकही झाली, हे सर्व पाकिस्तानची रणनीती उघड करणारे आहे."
- भारताने या निमित्ताने 'फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स' सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांकडून आलेल्या वारंवार मागण्यांनंतरही पाकिस्तान दहशतवाद्यांवर योग्य कारवाई करीत नाही.

### साजिद मीर कोण आहे?

- साजिद मीर हा पाकिस्तानी नागरिक असून, सन २००८मधील मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मुख्य मास्टरमाइंड आहे.
- तो लष्करे तैयबाचा वरिष्ठ म्होरक्या असून, जागतिक स्तरावर त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारवायांचा प्रमुख मानला जातो.
- अमेरिकन एजंट डेव्हिड कोलमन हेडलीची भरती साजिद मीरनेच केली होती.
- 'एफबीआय'च्या मीरने हेडलीला नाव बदलून दाऊद गिलानी केले.
- सन २०११मध्ये अमेरिकेने मीरवर गुन्हा दाखल केला आणि २०१२मध्ये त्याचे नाव 'स्पेशली डिझिग्नेटेड नॅशनल्स'च्या यादीत समाविष्ट केले. सध्या तो 'एफबीआय'च्या मोस्ट वाँटेड यादीत असून, त्याच्यावर पाच दशलक्ष डॉलरचे बक्षीस आहे.
- सन २०२३मध्ये अमेरिका आणि भारताने त्याला जागतिक दहशतवादी घोषित करण्याचा प्रस्ताव राष्ट्रसंघात मांडला होता; मात्र चीनने तो रोखला.
- पाकिस्तानने अनेक वर्षे त्याच्या अस्तित्वाचा इन्कार केला होता आणि नंतर तो मृत असल्याचा दावा केला.
- सन २००९मध्ये फ्रेंच न्यायमूर्ती जीन-लुई ब्रुगीएर यांनी मीरच्या पाक लष्कराशी असलेल्या संबंधांची पुष्टी केली होती.
- सन २०१२मध्ये अटक झालेल्या सय्यद जबिउद्दीन अन्सारीने चौकशीत मीर २००५मध्ये बनावट पासपोर्टवर मुंबईत आल्याचे सांगितले होते.

### पाकिस्तानने कबुली दिली कशी?

- 'फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स'चा दबाव वाढू लागल्यावर पाकिस्तानला साजिद मीरच्या अस्तित्वाचा कबुली द्यावी लागली. सन २०२२रमध्ये पाकिस्तानने त्याला लाहोरमधील दहशतवादविरोधी न्यायालयात आर्थिक गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले आणि १५ वर्षांची शिक्षा सुनावली. त्याला ४.२ लाख पाकिस्तानी रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला.
- पाकिस्तानने ही अटक 'फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स'कडे सादर केली; जेणेकरून त्याला 'ग्रे लिस्ट'मधून बाहेर पडता येईल. मात्र, भारताने हे प्रकरण पाकिस्तानच्या दुटप्पी धोरणाचे प्रतीक म्हणून जगासमोर मांडले.
- सन २०२३मध्ये मीरला तुरुंगात विषबाधा झाल्याची अफवा पसरली.

PCET's Pimpri Chinchwad University, Pune
Learn | Grow | Achieve
Pimpri Chinchwad Education Trust's
PIMPRI CHINCHWAD UNIVERSITY
Empowering Career Success : Unleash Your True Potential at Our World-Class University
ADMISSIONS OPEN 2025-26
Highlights at Pimpri Chinchwad Education Trust, Pune
34+ Years In Quality Education | 1,000+ Recruiters On Campus Every Year | 33,000+ Placements | 60,000+ Alumni | 61 Lacs P.A Highest Salary
1,200+ Faculty | 20,000+ Students on Campus Every Year | 4 Campuses | 5,500 Research Papers | 550+ Patents
Pimpri Chinchwad University proudly emerges as an initiative of the prestigious Pimpri Chinchwad Education Trust (PCET) in Pune
Programs at Pimpri Chinchwad University (PCU), Pune
B. Tech
B. Tech (Lateral Entry)
• Computer Science & Engineering • CSE (AI & ML) • CSE (AI & Data Science) • CSE (Semiconductor Technology)
M.Tech
Executive M.Tech
• CSE (AI) - For Working Professionals
BCA
MCA
B.Sc.
• Computer Science (CS)
B.Sc.
• Nutrition & Dietetics • Clinical Psychology
MBA
♦ International ♦ General ♦ Business Analytics & AI ♦ Agribusiness Mgmt. ♦ Pharma Mgmt.
• International Study Tour • International Certifications
Specializations (Dual)
• Marketing • Human Resource Mgmt. • Finance • Digital Marketing • Fintech • Investment Banking • Logistics & Supply Chain • Entrepreneurship & Venture Dev.
* 16 Additional Certifications
BBA
• Marketing • HR Management • Finance • Digital Marketing • FinTech • Business Analytics
BBA • Media & Communication
B.Des.
B.Des. (Lateral Entry)
• Product Design • Visual Communication • Fashion & Apparel Design • Interior & Space Design • Animation & Game Design
M.Des.
• Interior & Space Design • UI / UX Design
Pharmacy
• B. Pharm • D. Pharm • B. Pharm (Lateral Entry)
B.Sc.
• Animation, VFX & Multimedia
Law
• B.A. LL.B. • LL.B. • LL.M.
B.Voc Ph.D.
For Admission. : 8010211343 / 8999915986
PCET's Pimpri Chinchwad University (PCU)
Sate Maval (PMRDA), Pune- 412106, MH, India
: +91 9046 9090 03 : +91 83 8181 4141
: admissions@pcu.edu.in : www.PCU.edu.in
APPLY NOW
Pimpri Chinchwad Education Trust (PCET)
Sector No. 26, Near Akurdi Railway Station, Pradhikaran, Nigdi, Pune – 411 044.
: 020-2760-0100 : www.PCET.org.in

**Reliance**
**Industries Limited**
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

## सूचना

### (कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)

**विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणात हस्तांतरण**

गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या (''नियम'') मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

इतर मुद्द्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशांचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (''आयईपीएफ'') प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.

नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०१६-१७ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित, योग्य कार्यवाही करण्यासाठी, दिनांक ७ मे, २०२५ च्या पत्राद्वारे व्यक्तिगतरित्या संबंधित भागधारकांना कळविले आहे.

कंपनीने आपल्या वेबसाईटवर **www.ril.com** आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला आहे. भागधारकांना **https://www.ril.com/investors/shares/dividend-shares** ही वेब-लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारकांनी दावा न केलेला लाभांश व समभाग, दोन्ही जे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.

प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्यापाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी कंपनी नियमांनुसार डिमटेरियलाइज करण्यासाठी आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतींसाठीची योग्य सूचना आहे.

**कंपनीला संबंधित भागधारकांकडून ४ ऑगस्ट, २०२५ रोजी किंवा तत्पुर्वी कोणतेही उत्तर (दावा न केलेल्या/वसूल न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासंदर्भात) न मिळाल्यास, नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या पद्धतींनुसार कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे कंपनी नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समभाग डिमटिरिअलाईजकरून ते आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करेल.**

भागधारकांना या संदर्भात आणि नियमांविषयी काही शंका असल्यास, त्यानी **केफिन टेक्नॉलॉजीस् लिमिटेड (युनिट: रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड)**, कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट यांच्याशी पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१ – ३२, गचीबोवली, फायनानशियल डिस्ट्रीक्ट, नानाक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२; टोल फ्री क्र: १८००-३०९-४००१ (सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.०० (भाप्रवेळ) ते सायंकाळी ६.०० (भाप्रवेळ), ई-मेल: rilinvestor@kfintech.com, वेबसाईट: www.kfintech.com येथे संपर्क साधावा.

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
सही/-
**साविथ्री पारेख**
**कंपनी सेक्रेटरी**
**आणि कंप्लायन्स ऑफिसर**

स्थळ : मुंबई
दिनांक : ८ मे, २०२५

www.ril.com

# SPEAK FOR INDIA

SPOTLIGHT

# देशाचं भविष्य उज्ज्वल

**टाइम्स ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र टाइम्सच्या सहकार्याने फेडरल बँक हॉर्मिस मेमोरियल फाउण्डेशनतर्फे आयोजित 'स्पीक फॉर इंडिया २०२४-२५'ची महाराष्ट्र आवृत्ती नुकतीच पार पडली. या वादविवाद स्पर्धेने देशात खरेखुरे बदल घडवून आणू शकणाऱ्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी तरुणांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिलं.**



कमोडोर(नि.) कुलदीप टांकसाळे, फेडरल बँकेचे व्हाइस प्रेसिडण्ट अजित मधुकर देशपांडे, डेप्युटी व्हाइस प्रेसिडण्ट चेतन चिंतामणी आफळे, विजेता अभय कृष्णकांत अळशी, उपविजेता चैतन्य कुंडलिक कांबळे, अभिनेता विक्रांत मेस्सी, एनजीएमएच्या डायरेक्टर आएएस अधिकारी निधी चौधरी, दिग्दर्शक सतीश राजवाडे

टीम मटा
mtartnedit@timesofindia.com

'स्पीक फॉर इंडिया २०२४-२५'च्या महाराष्ट्र आवृत्तीची अंतिम फेरी मुंबईच्या लाला लजपतराय कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्समध्ये पार पडली. यावेळी महाराष्ट्रातल्या विविध भागातून आलेल्या तरुणांनी सभागृह फुलून गेलं होतं. त्यामुळे ऊर्जा आणि उत्साहाचं वातावरण निर्माण झालं होतं. फेडरल बँक हॉर्मिस मेमोरियल फाउण्डेशनने टाइम्स ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र टाइम्सच्या सहकार्याने या उपक्रमाचं आयोजन केलं होतं. त्यात तरुणांना आजच्या ज्वलंत मुद्द्यांवर लोकशाही मार्गाने आपले विचार मांडण्याची आणि वादविवाद करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

राज्यभरातल्या हुशार स्पर्धकांमधून निवड झालेले आठ जण अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचले होते. त्यांची दोन गटांत विभागणी करण्यात आली. दोन्ही गटातल्या प्रत्येकी दोन स्पर्धकांनी स्पर्धेत देण्यात आलेल्या मुद्द्याच्या बाजूने तर दोन स्पर्धकांनी विरोधात आपली मतं मांडली. अनेक फेऱ्यांमधल्या चुरशीनंतर दोन स्पर्धक अंतिम फेरीत पोहोचले.

स्पर्धेच्या परीक्षक मंडळात दिग्दर्शक सतीश राजवाडे, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टच्या डायरेक्टर आयएएस अधिकारी निधी चौधरी, माजी नौदल अधिकारी आणि विमान वाहतूक व सागरी रणनीती तज्ज्ञ असणारे कमोडोर(नि.) कुलदीप टांकसाळे यांचा समावेश होता.

स्पर्धेच्या अंतिम फेरीत मुंबईच्या व्ही.जी.वझे कॉलेजचा अभय कृष्णकांत अळशी आणि कोल्हापूरच्या के.एच.कॉलेजचा चैतन्य कुंडलिक कांबळे यांच्यात वादविवाद झाला. त्यांना 'बहुतांश खेळांमध्ये प्रमुख क्रीडा स्पर्धा सुरू झाल्यामुळे तरुणांनी खेळाला करिअर म्हणून स्वीकारणं योग्य आहे का' हा विषय देण्यात आला होता. अळशीने जोरदार युक्तिवाद केला.

तो म्हणाला की,

'श्रीमंत घरात जन्मलेल्या लोकांसाठी हे जग संधींनी भरलेलं आहे. त्यावर विश्वास ठेवणंही त्यांच्यासाठी खूप सोपं आहे. पण हेच जग इतर अनेकजणांसाठी खूप खडतर आणि समान संधींचा अभाव असणारं आहे. जोपर्यंत झटपट सामने आणि स्पर्धांच्या पुढे जाऊन एक बळकट व्यवस्था निर्माण होणार नाही, तोपर्यंत खेळाडू कितीही प्रतिभावान असला तरी त्याला टिकून राहण्यासाठी संघर्ष करावाच लागेल.' हीच वैचारिक भूमिका मांडल्यामुळे अभय अळशी स्पर्धेचा विजेता ठरला. त्याला प्रमाणपत्र, चषक आणि २.५ लाख रुपयांचं रोख बक्षीस मिळालं. तर उपविजेता ठरलेला चैतन्य कांबळे १.५ लाख रुपयांच्या रोख बक्षिसासही पात्र ठरला. स्पर्धेतल्या उर्वरित सहा स्पर्धकांनीसुद्धा आपली मतं प्रभावीपणे मांडली. त्या सर्वांना प्रत्येक ५०,००० रुपयांची प्रोत्साहनपर पारितोषिकं देण्यात आली.





### चर्चेला सुरुवात

या वादविवाद स्पर्धेची सुरुवात 'आपल्याला स्वत:चा अवयव विकण्याचा अधिकार असावा का?' या विषयाने झाली. या गुंतागुंतीच्या मुद्द्यावर पहिल्या चार स्पर्धकांनी, कृषिका मिश्रा

FEDERAL BANK
YOUR PERFECT BANKING PARTNER
SPEAK FOR INDIA
MAHARASHTRA EDITION 2024-25
In association with THE TIMES OF INDIA महाराष्ट्र टाइम्स
An Initiative by Federal Bank Hormis Memorial Foundation

(डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आकुर्डी, पुणे) अभय कृष्णकांत अळशी (व्ही.जी.वझे कॉलेज, मुंबई), यश चव्हाण (एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, पुणे) आणि श्लोक शाह(एमपीएसटीएमई, मुंबई), यांनी आपली मतं व्यक्त केली.

अळशी आणि शाह यांनी या अवयव विक्रीला जोरदार विरोध केला. त्यात त्यांनी अवयव विक्रीतून एखाद्याला तात्पुरता आर्थिक फायदा होऊ शकतो, पण त्यामुळे त्याच्या जिवंत राहण्याच्या आणि जगण्याच्या अधिकारावर गंडातर येऊ शकतं, हे अधोरेखित केलं. तसंच अवयवदान आणि विक्री यांच्यातली सीमारेषा पुसट असल्याकडेही उपस्थितांचं लक्ष वेधलं.

दुसऱ्या बाजूने बोलताना मिश्रा आणि चव्हाण यांनी अवयव विक्रीचं समर्थन केलं. अवयव विकण्यास कायदेशीर मान्यता दिली तर अनेकजणांच्या आर्थिक समस्या कमी होतील आणि अनेकांचे प्राण वाचू शकतील. यात विक्रेता आणि खरेदीदार अशा दोघांचाही फायदा होऊ शकतो. मृत्यूनंतर अवयव दान करण्यात एकालाच लाभ मिळतो, असं ते म्हणाले.

### वैचारिक द्वंद्व

दुसऱ्या फेरीत 'विद्यार्थ्यांसाठी ड्रग चाचणी अनिवार्य करणं, हा व्यसनाधीनता नियंत्रणात आणण्यावरचा उपाय आहे का?'





असा विषय चर्चेसाठी देण्यात आला होता. त्यात सौम्या बन्सल (डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, नागपूर), प्रिया सोली(सेण्ट झेवियर्स कॉलेज, मुंबई), आदित्य देशमुख(जोशी बेडेकर कॉलेज, ठाणे) आणि चैतन्य कुंडलिक कांबळे (के.एच.कॉलेज, गारगोटी, कोल्हापूर) यांचा सहभाग होता. बन्सल आणि देशमुख या दोघांनी ड्रग चाचणी अनिवार्य करण्याच्या बाजूने आपलं मत मांडलं. ड्रग चाचणी अनिवार्य केली तर लवकर निदान होईल आणि त्यानंतर प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतील. हा तोडगा व्यसनाधीन विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनापेक्षा अधिक प्रभावी उपाय ठरू शकतो.

त्या विरोधात बोलताना सोली आणि कांबळे म्हणाले की, अनिवार्य ड्रग चाचणीमुळे विद्यार्थांना संभाव्य आघात आणि अपमानाला सामोरं जावं लागेल. त्यामुळे त्यांच्या आयुष्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. तसंच त्यांची वर्तणूक, भावनिक आणि शैक्षणिक कामगिरी प्रभावित होऊ शकते. या फेऱ्यांनंतर अळशी आणि कांबळे यांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.



### उद्याचा सशक्त आवाज

शेवटच्या आठही स्पर्धकांचा उच्च पातळीवरील युक्तिवाद ऐकून प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार खूप प्रभावित झाले. ते म्हणाले की, 'या कार्यक्रमाचं आयोजन हे केवळ 'स्पीक फॉर इंडिया'साठी नव्हे, तर ते 'स्ट्रेन्थ फॉर इंडिया'साठी आहे, असं म्हणणं अधिक योग्य ठरेल.'

अभिनेता विक्रांत मेस्सी हाही यावेळी उपस्थित होता. तो म्हणाला की,

'भारतात तरुणांची संख्या मोठी आहे. आजची चर्चा ऐकल्यावर माझं असं मत बनलं आहे की, आपला देश योग्य हातात आहे.'

फेडरल बँकेचे व्हाइस प्रेसिडण्ट अजित मधुकर देशपांडे यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचं सक्षमीकरण होत असल्याचं सांगितलं. ते म्हणाले की, 'स्पीक फॉर इंडिया हे एक असं व्यासपीठ आहे, जे देशाला प्रभावित करणाऱ्या मुद्द्यांवर आपले विचार मांडण्यास विद्यार्थ्यांना सक्षम बनवतं. गेल्या दहा वर्षांपासून टाइम्स ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र टाइम्सच्या सहकार्याने हा उपक्रम तरुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. एवढंच नाही तर महाराष्ट्राबाहेरसुद्धा देशभर हा उपक्रम राबवण्यात येत असून तो भविष्यातली सशक्त पिढी घडवण्याचं काम करत आहे. आज या उपक्रमाशी लाखो विद्यार्थी जोडले गेले आहेत. म्हणूनच परीक्षेचा काळ असूनही यंदाच्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.'

लाला लजपतराय कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्सच्या प्राचार्या डॉ.हरमीत कौर भसीन म्हणाल्या की,

'भारताची ताकद ही नेहमीच तरुणांच्या निर्भय, विचारशील आणि दृढनिश्चयी आवाजातून दिसून होते. या स्पर्धेत बोलण्यात आलेल्या प्रत्येक शब्दातून देशाविषयी असणारी बांधिलकी आणि उज्ज्वल भविष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो.'

'स्पीक फॉर इंडिया'ने तरुणांचा आवाज बुलंद केला आहे. यंदाही विचारशील समाज घडवण्यात सहभाग घेणाऱ्या तरुणांसाठी विचार मांडणारं एक सशक्त व्यासपीठ म्हणून 'स्पीक फॉर इंडिया'ने आपली भूमिका बजावली आहे.